**सत्र खटला क्र. १०/२०२५ मधील फौजदारी जामीन अर्ज**
**मनिषा देवानंद उर्फ नंदकिशोर घुगे**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
**CNR NO. MHBU20-000198-2025)**

## नि.क्र. ७ खाली आदेश
**(पारीत दिनांक ०४ एप्रिल २०२५)**

**०१]** अर्जदार **– मनिषा देवानंद उर्फ नंदकिशोर घुगे** हिने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, बिबी येथील अपराध क्र. २५२/२०२४, कलम १०३ (१) भारतीय न्याय संहिता खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीची पत्नी आरोपी मनिषा घुगे हीचे मंगेश लादे या दुसऱ्या व्यक्ती सोबत पुणे येथे राहत असतांना प्रेमसबंध होते. त्यामुळे फिर्यादी त्याच्या कुटुंबासह त्याचे मुळ गावी महार चिकना, ता. लोणार येथे राहण्यास आला. फिर्यादी हा नेहमी ट्रकवर कामाला जात असे आणि आरोपी मनिषा घुगे व त्यांचा मुलगा मृतक सुर्यकांत ऊर्फ शिवराज घुगे वय–१५ महीने हे घरी राहत असे. दिनांक २९.११.२०२४ रोजी फिर्यादी हा बाहेरगावी ट्रकवर कामाला गेलेला होता आणि आरोपीची सासू व दिर शेतात कामाला गेलेले होते. आरोपीचा मुलगा हा लहान असल्याने, फिर्यादी हा आरोपीला फारकती देणार नाही, तसेच आरोपीचा मुलगा/मृतक हा तिच्या प्रेमसबंधामध्ये अडसर ठरु नये म्हणून आरोपीने मृतक सुर्यकांत हा झोपेत असतांना, त्याला जिवे ठार मारण्याचे उददेशाने, झोक्यातुन उचलुन घराबाहेर असलेल्या पाण्याच्या टाकीत टाकून दिले. मृतक सुर्यकांत याच्या रडण्याचा आवाज येऊ नये म्हणून आरोपीने वरुन टाक्यावर टोपले/झाकन ठेवून मृतक यास पाण्यात बुडवुन जिवाने ठार मारले. त्यानंतर आरोपीने फिर्यादी व त्याचे नातेवाईकांसमोर गुन्ह्याची कबुली दिली. म्हणून फिर्यादीने पोलीस ठाणे, बिबी येथे फिर्याद दाखल केली.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. जी. डी. लांडगे यांनी युक्तिवाद केला

की, फिर्यादीची फिर्याद, साक्षीदार सचिन याचा जबाब आणि इतर साक्षीदारांचे जबाब यामध्ये प्रचंड तफावत आहे. सर्व साक्षीदार घटनेबाबत वेगवेगळ्या ठिकाणी माहिती मिळाली असल्याचे सांगतात. त्यामुळे अभियोग पक्षाची कथा संशयास्पद आहे. फिर्यादी व साक्षीदार हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे फिर्यादी व सर्व साक्षीदार यांनी कट रचून आरोपीला खोट्या गुन्ह्यात फसवले आहे. विद्वान विधिज्ञांनी न्यायालयाचे घटनास्थळ पंचनाम्याकडे लक्ष वेधले. घटनास्थळ पंचनाम्यातील नकाशा दाखवून विधिज्ञांनी युक्तिवाद केला की, पाण्याची टाकी / निळा ड्रम हा ओट्याला लागून आहे. त्यामुळे एखादे लहान बाळ ओट्यावरून ड्रम मध्ये पडून त्याचा जिव जाणे स्वाभावीक आहे. आरोपी ही मृतकाची जन्मदाती असल्याने स्वतःच्या मुलाचा जिव घेणे असंभव आहे. याउलट साक्षीदारांच्या बयाणानुसार घटनेबाबत समोर आलेली माहिती ही पुर्णपणे संशयास्पद आहे.

०४] अर्जदार / आरोपी हिच्या वतीने पुढे युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदार ही महिला असून तिची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. या प्रकरणातील तपास संपलेला असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे आरोपीच्या अधीक कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. आरोपी / अर्जदार हिला जामीन दिल्यास ती जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. त्यामुळे आरोपी/अर्जदाराला जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

०५] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. एस. एम. खत्री यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, फिर्याद व बयाणामध्ये असलेली तफावत ही घटनेच्या अनुषंगाने नाही. त्यामुळे ही तफावत मुख्य घटने संबंधाने नाही. आरोपी / अर्जदाराविरूद्ध स्पष्ट आरोप असून आरोपीने गुन्हा केला असल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध होते. अशा परिस्थितीत अर्जदाराला जामीन मिळाल्यास ती साक्षीदारांवर दबाव आणू शकते किंवा ती फरार देखील होऊ शकते. म्हणून अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०६] वरील युक्तिवादाच्या अनुषंगाने दोषारोपपत्रातील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसून येते की, हे प्रकरण परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. फिर्याद व

साक्षीदारांची बयाणे बारकाईने बघितली असता, आरोपीचे विवाहबाह्य संबंध असून त्या व्यक्तीच्या नावाचा फिर्याद व बयाणात स्पष्ट उल्लेख आहे. परिणामी गुन्हा करण्या मागचा हेतू व उद्देश काय होता हे समोर आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद, साक्षीदारांची बयाणे यामध्ये घटना वेगवेगळ्या ठिकाणी माहिती झाल्याचा उल्लेख आहे. तथापि ही तफावत घटनेच्या अनुषंगाने नसल्याने महत्त्वपूर्ण नाही व त्या आधारे अभियोग पक्षाचे प्रकरण व घटना पूर्णपणे फेटाळणे न्यायोचित होत नाही.

०७] या प्रकरणातील सर्व प्रथम मोक्यावर पोहोचलेला साक्षीदार नामे दिनकर घुगे याचे बयाण बघितले असता असे दिसून येते की, आरोपीच्या घराच्या पाठीमागे प्लॅस्टीकची ५०० लिटरची टाकी पाहिली असता टाकीवर टोपले झाकण ठेवलेले होते व टाकीवरील टोपले काढून पाहिले असता त्याला आरोपी मनिषा हिचा लहान मुलगा शिवराज हा पाण्यात तरंगत असलेला दिसला. या बयाणानुसार पाण्याच्या टाकीवर टोपले झाकण असते तर आरोपीचा मुलगा पाण्याच्या टाकीत पडला नसता. तसेच घटनास्थळ पंचनामा बघितला असता त्यामध्ये पाण्याची टाकी ओट्याच्या खाली ठेवण्यात आली असा उल्लेख नाही. उलट घटनास्थळ पंचनाम्यात छपरीच्या पूर्व दिशेला ५ फुट अंतरावर निळ्या रंगाची ५०० Lt क्षमतेची पाण्याची टाकी असून तिची जमिनी पासून उंची ३ फुट असल्याचे दिसून येते. त्यामुळे लहान मुल त्या टाकीत पडणे अशक्य आहे. आरोपीचे शेजारी यांच्या बयाणावरून घटनेच्या दिवशी आरोपी व मृतक घरात दोघेच सोबत असल्याचे दिसून येते. त्यामुळे या सर्व बाबींच्या आधारे व गुन्ह्यामागील हेतू आणि उद्देश पाहता आरोपीने प्रथम दर्शनी स्वतःच्या मुलाची हत्या केली असल्याचे दिसून येते.

०८] याशिवाय या प्रकरणातील गुन्ह्यात मृत्यू दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. आरोपी व साक्षीदार हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे गुन्ह्याचे स्वरूप पाहता आरोपीला जामीन मिळाल्यास ती साक्षीदारांवर दबाव आणू शकते. शिवाय आरोपीच्या फरार होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. म्हणून गुन्ह्याचे स्वरूप, गुन्ह्यासाठी असलेली शिक्षेची तरतूद व आरोपी कृत्य पाहता आरोपीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

जामीन अर्ज (नि.क्र. ०७) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2025.04.05 17:31:30 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – ०४.०४.२०२५**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – २, मेहकर

दिनांक – ०४.०४.२०२५